पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९३३/२०१४
दिनांक : २१/११/२०१४

प्रति,
मा......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक २६/११/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२६/११/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**

दिनांक : २६/११/२०१४ वेळ : दुपारी - ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२६/११/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक ०८/१०/२०१४, २७/१०/२०१४ व १२/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ६ )** चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक १५/११/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ७ )** चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिरप्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता महिला बाल कल्याण योजने अंतर्गत एकूण ४०६८ अर्ज प्राप्त झाले असून या अर्जाची तपासणी प्रक्रीया चालू असून त्यामध्ये अंदाजे ६०% अर्ज पात्र होण्याची शक्यता वाटते. म्हणजेच प्राप्त अर्जांपैकी अंदाजे एकूण २४०० अर्ज पात्र होतील असे मत आहे. म्हणजेच या दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान एकूण ४८७६ सायकली खरेदी कराव्या लागणार असून अंदाजे किमान एकूण ५००० सायकली खरेदीची मागणी करणे उचित वाटते. सदरच्या सायकली गतवर्षीच्या खरेदी किंमतीमध्ये १०% दरवाढ विचारात घेता अंदाजे र.रु.३८३०/- प्रती नग या दराने खरेदी कराव्या लागतील. त्यानुसार एकूण रक्कम रुपये १,९१,५०,०००/- ( अक्षरी र.रु.एक कोटी एक्याण्णव लाख पन्नास हजार फक्त ) इतका खर्च अपेक्षित आहे. या योजनेसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये १,५७,५०,०००/- एवढी तरतूद आहे. उपलब्ध

तरतूदीचा विचार करता रक्कम रुपये ३४,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये चौतीस लाख फक्त ) इतकी तरतूद कमी पडणार असून सदरची तरतूद सुधारित अंदाजपत्रकात करण्यात येईल. तरी सदरच्या सायकली खरेदी करण्यात मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९३३/२०१४
दिनांक : २१/११/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.